# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.05/09/2018**
**(तहकुब सभा दि.04/09/2018)**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' मधील प्रकरण दोन (के) अन्वये प्रस्ताव**

**प्रकरण क्र.७१ :- बोर्ड/बॅनर इ. जाहिरातींमुळे शहराचे होणारे विद्रुपीकरण थांबविणेबाबत.**

**ठराव क्र. ७२ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दितील अनधिकृत पणे उभारण्यांत येणा-या जाहिराती/ बॅनर/ होर्डिग /पोस्टर्स/डीजीटल फ्लॅक्स /तात्पुरत्या आर्चेस(कमानी) इ.द्वारे प्रसिध्द होणा-या जाहिरात विरुध्द संबंधित प्राधिकरण प्रभावीपण कारवाई करीत नसल्याने मा.उच्च न्यायालय मुंबई येथे जनहीत जाचिका १५५/२०११ दाखल करण्यांत आली. सदर याचीकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.०६/०८/२०१४ रोजी पारीत केलेल्या निर्णयानुसार अनधिकृत जाहिरातींवर प्रभावीपणे कारवाई करणेकरीता सविस्तर आदेश पारीत केलेला आहे. व प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती कार्यालय क्र. १ ते ६ यांना नोडल ऑफिसर म्हणुन नियुक्त करण्यांत आले होते व त्यांना खालीलप्रमाणे कामाचे स्वरुप देण्यांत आले होते.

1. शुभेच्छांचे तात्पुरत्या स्वरुपाचे जाहिराती/ बॅनर/ होर्डिग /पोस्टर्स/डीजीटल फ्लॅक्स /कटआऊट/तात्पुरत्या आर्चेस(कमानी) इ. यांचे आकारमान ६ x ४ कमाल चौ.फुटापर्यंत असणे बंधनकारक करावे तसेच एकाच वेळी एकाच अर्जदारास एका जाहिरातीकरीता फक्त ५ बॅनरची परवानगी देण्यांत यावी.

२ तात्पुरत्या स्वरुपाचे जाहिराती/ बॅनर/ होर्डिग /पोस्टर्स/डीजीटल फ्लॅक्स/कटआऊट/तात्पुरत्या आर्चेस(कमानी) इ. करीता परवानगी फक्त ५ दिवसांकरीता देण्यांत यावी.

३ तात्पुरत्या स्वरुपाचे जाहिराती/ बॅनर/ होर्डिग /पोस्टर्स/डीजीटल फ्लॅक्स /कटआऊट/तात्पुरत्या आर्चेस(कमानी) इ. करीता परवानगी देते वेळी अर्जदाराकडून जाहिरात फी करीता होणा-या शुल्काच्या १० पट अनामत रक्कम महानगरपालिकेकडे जमा करावी व मुदतीत जाहिरातीचे फलक न काढल्यास अनामत रक्कम जप्त करावी. तसेच अनामत रक्कमेकरीता संबंधितांनी सर्व फलक स्वत: काढून टाकलेबाबतचे छायाचित्रासह अर्ज करणे बंधनकारक करावे तद्नंतर अनामत रक्कम अदा करण्यांत यावी.

४) जाहिरात फलकावर मुद्रक, प्रकाशक यांचे नाव, जावक क्र. व परवानगीचा कालावधी नमुद करणे बंधनकारक करावे ज्या फलकंावर असे नमुद नसल्यास सदरचे फलक त्वरीत काढण्यांत यावेत व संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यांत यावेत.

परंतु दि.०१/०३/२०१८ रोजीच्या आदेशानुसार उपआयुक्त (जाहिरात) यांना नोडल ऑफिसर म्हणुन नियुक्त करण्यांत आले आहे. त्याअनुषंगाने सर्व प्रभाग अधिका-यांमार्फत निश्चित केलेल्या त्यांच्या कार्यक्षेत्रात अनधिकृतपणे उभारलेल्या जाहिराती/. बॅनर/ होर्डिग /पोस्टर्स/डीजीटल फ्लॅक्स /तात्पुरत्या आर्चेस(कमानी) इ.वर नियमीत कारवाई करण्यांत येते. त्यावर उपआयुकत (जाहिरात) यांचे नियंत्रण आहे.

यासर्व बाबी करीत असताना महानगरपालिका क्षेत्रात विविध राजकीय पक्ष, राजकीय कार्यकर्ते, शैक्षणीक संस्था व वैयक्तीक स्वरुपात विविध ठिकाणी छोट्या मोठया प्रमाणात बोर्ड बॅनर उभारले जातात त्यापैकी परवानगी घेतलेल्या असल्या तरी परवानगी नंतरही जाहिरात प्रसिध्द होत असते. यावर प्रभाग कार्यालयामार्फत नियमीत कारवाई करण्यांत येते परंतु अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने ब-याच ठिकाणी छोट्या मोठया जाहिराती काढण्याचे राहून जाते त्यामुळे शहराचे विद्रुपीकरण होत असते. यासर्व बाबींचा विचार करता यापूढे कोणत्याही प्रकारची पोस्टर्स/बॅनर इ. प्रसिध्द करण्यास मज्जाव केल्यास यासर्व विद्रुपीकरणास चाप बसु शकेल.

ज्याठिकाणी महानगरपालिकेने २४६ होर्डींग उभारण्यास परवानगी देण्यांत आली होती. त्यापैकी १४८ होर्डींगचा ठेका कालावधी चालु आहे. उर्वरीत ९८ होर्डींगचा ठेक्याचा कालावधी संपला असुन निविदा प्रक्रीया प्रस्तावित आहे अशा एकुण २४६ होर्डींग महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर आहेत तसेच बी.ओ.टी. तत्वावर

२१ कॅन्टीलीवर यांची उभारणी केली असुन करारनाम्यानुसार संबंधितांना १५ वर्षांकरीता असुन प्रत्येक वर्षी परवानगी देण्यांत येते. तसेच मे.जी.सी.सी. क्लब यांनी ४ होर्डिंग उभारलेल्या आहेत. (अशा एकुण महानगरपालिकेच्या जागेवर २७१ होर्डिग आहेत) या व्यतीरीक्त शहरात खाजगी जागांवर ८२ होर्डिंग उभारणेस परवानगी देण्यांत आलेली आहे. (एकुण एकत्रीत ३५३ ठिकाण)

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात फक्त अधिकृत होर्डिंगवर जाहिरात होणे आवश्यक असुन त्यासाठी सार्वजनिक जागांवर होर्डिग व रस्त्याच्या दुभाजकांच्या ठिकाणी कॅन्टीलीवर महानगरपालिकेमार्फत उभारल्यास महानगरपालिकेस मोठया प्रमाणावर कायमस्वरुपी उत्पन्न मिळु शकेल. सदर होर्डिग या टप्प्याटप्प्याने महानगरपालिकेमार्फत शासन अनुदानातुन व महानगरपालिका निधितुन बांधता येतील. महानगरपालिकेच्या स्वत:च्या होर्डिंग बांधेपर्यंत कंत्राट पध्दतीने दिलेल्या होर्डिंगवरील जाहिराती सुरु ठेवण्यांत येतील व तद्नंतर टप्प्याटप्प्याने महानगरपालिकेच्या स्थायी होर्डिंग/कमानी/कॅन्टीलीवर इ. एम.एस.स्ट्रक्चरवर तयार करुन सदर कंत्राट रद्द करण्यांत येईल. यासाठी आवश्यक निधी वेळोवेळी उपलब्ध करुन द्यावी. महानगरपालिकेमार्फत टप्प्याटप्प्याने सर्व ठिकाणी होर्डिंग उभारणेकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे. प्रशासनाने याबाबत आवश्यक प्रक्रिया करावी.

संपूर्ण शहरात विविध प्रकारचे तसेच विविध आकारमानाचे जाहिराती अस्ताव्यस्तपणे खांबावर, झाडांवर व इतरस्त्र लटकवलेल्या स्थितीत असतात त्यामुळे शहर विद्रुप दिसत असल्याने त्यावर कारवाई करताना अपु-या मनुष्यबळामुळे विलंब होतो. त्यामुळे यापूढे अधिकृत स्थायी होर्डिंग/कमानी/कॅन्टीलीवर इ. (एम.एस.स्ट्रक्चरवरील) व्यतीरीक्त कोणत्याही ठिकाणी जाहिरातीसाठी परवानगी देण्यांत येऊ नये तसेच शहरात कोणत्याही जागेवर तात्पुरत्या स्वरुपाचे बॅनर/बोर्ड/फलक/कमानी/फ्लॅक्स इत्यादींना परवानगी देण्यांत येऊ नये व अनधिकृतपणे जाहिरातीं करणा-यांवर कायदेशिर कारवाई करण्यांत यावी. यापुढे मा. आयुक्त यांनी खाजगी ठेकेदार नेमून दि.०१/१०/२०१८ पासून अनधिकृतपणे जाहिराती निष्कासीत करण्याची कार्यवाही करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :-** श्री. ध्रुवकिशोर पाटील

**अनुमोदक :-** श्री. दिनेश जैन

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

**महापौर**

**मिरा भाईदर महानगरपालिका**